(1)

क्रमांक-शिक्षण/प्राशा/३/मा वि/ 11 /२००४.
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
दिनांक - 20/9 /२००४.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
~~प्रियदर्शनी प्रायमरी स्कूल इंग्लीश मिडियम पिंपरी~~

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत. [इंग्रजीमाध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएनएस/१००२/[१०००/०२] प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. 30/9/04 चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या वर्गांना २००३- २००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक वा अतिरिक्त | विनाअनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | प्रियदर्शनी प्रायमरी स्कूल इंग्लीश मिडियम पिंपरी | इंग्रजी | इ. १ ली | अतिरिक्त | दुसरा व तिसरा वर्ग मंजूर |
| | | | इ. २ री | नैसर्गिक वाढ | पहिला वर्ग नैसर्गिक मंजूर व दुसरा व तिसरा वर्ग मंजूर |
| | | | इ. ३ री ते ४ थी | नै/अति | प्रत्येकी पहिला नैसर्गिक व दुसरा अतिरिक्त वर्ग मंजूर |
| | | | इ. ५ वी ते ७ वी | नैसर्गिक | प्रत्येकी पहिला वर्ग मंजूर |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [एस. एस. सी. डी. एड. ]

[कृ. मा. प.]

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद् करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

परवानगी वर्ष : २००३ - २००४
माध्यम : इंग्रजी
कायम विना अनुदान

B3Y/3V

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२० ०४/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय,
दिनांक : 15 JUN 2004

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता
प्रियदर्शनी हायस्कूल, भोसरी [इंद्रायणीनगर] पुणे-२६

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/०४[३२५] दि. २१/४/२००४

२. शा.प.क्र. नमाशा-१००३/[७८४/०३]माशि-१, दि. २/१२/२००३

३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य-३[१४]नमाशा/मान्यता/पुवि/५८७२/८३/२००४/दि. ६/३/२००४.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे संस्थेच्या प्रियदर्शनी हायस्कूल, भोसरी [इंद्रायणीनगर] पुणे-२६ ------------------------ माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००३-२००४ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००३ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्तता अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी मागणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत १. मुख्याध्यापक, प्रियदर्शनी हायस्कूल, भोसरी, [इंद्रायणीनगर]पुणे-२६.

२. निवडनस्ती